आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in








# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २८० वा ● रविवार दि. २४ मार्च २०२४ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●


## ईडी च्या कारवाईवर वाड्रा म्हणतात, 'केजरीवालांना ९ वेळा..'

नवी दिल्ली : काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधींचे पती रॉबर्ट वाड्रा यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सक्तवसुली संचलनालयाने केलेल्या अटकेवर राजकीय प्रतिक्रिया नोंदवली आहे. मात्र त्यांनी नोंदवलेली प्रतिक्रिया ही काँग्रेसच्या भूमिकेविरोधात असल्याची चर्चा असून जावयानेच काँग्रेसला घरचा आहेर दिल्याचं बोललं जात आहे. 'भारतीय जनता पार्टीचं सरकार जेव्हा जेव्हा सत्तेत आलं आहे तेव्हा त्यांनी यंत्रणांचा गैरवापर केला,' असा टोला वाड्रा यांनी लगावला. 'मी सुद्धा हे सारं काही सहन केलं आहे. माझ्यावरही बिनबुडाचे आरोप लावण्यात आले. मला जे प्रश्न विचारण्यात आले त्यामधून काहीच हाती लागणार नव्हतं. त्या प्रश्नांमध्ये फारसा दम नव्हता. मात्र जेवढ्या वेळा चौकशीसाठी बोलावण्यात आलं त्या त्यावेळी मी दिलेल्या शेवटच्या तारखेच्या आधीच चौकशीसाठी हजर राहिलो होतो.

## मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती यांच्या हस्ते देवणी येथील न्यायालय इमारतीचे उद्घाटन

लातूर, : देवणी येथे उभारण्यात आलेल्या



दिवाणी व फौजदारी न्यायालय इमारतीचे उद्घाटन आज मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मंगेश पाटील यांच्या हस्ते झाले. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नीरज धोटे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विजय पाटील होते.

न्यायमूर्ती श्री. पाटील आणि न्यायमूर्ती श्री. धोटे यांच्या हस्ते फीत कापून आणि कोनशीला अनावरण करून इमारतीचे उद्घाटन झाले. यावेळी उपस्थितांनी इमारतीची पाहणी करून माहिती घेतली. तसेच न्यायमूर्ती श्री. पाटील आणि न्यायमूर्ती श्री. धोटे यांनी उपस्थित विधी अधिकारी, विधिज्ञ यांच्याशी संवाद साधला.

देवणीचे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अतिष खोल्लम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जी. जी. क्षीरसागर, निलंगाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यावेळी उपस्थित होते.

## लातूर महानगरपालिका क्षेत्रात २४ मार्च रोजी वाईन शॉप, बिअर शॉपच्या कालावधीत वाढ

लातूर, : होळी अथवा रंगपंचमीला वाईन शॉप (एफएल-१), बिअर शॉप (एफएल बीआर-१) या अस्थापना निर्धारित वेळेपेक्षा अधिक कालावधीमध्ये उघड्या ठेवण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार लातूर महानगरपालिका क्षेत्रातील वाईन शॉप (एफएल-१), बिअर शॉप (एफएल बीआर-१) या अनुज्ञप्ती प्रकारातील आस्थापना सुरु ठेवण्यास २४ मार्च २०२४ रोजी रात्री १०.३० ते १२ वाजेपर्यंतच्या वाढीव वेळे देण्यात आल्याचे आदेश राज्य उत्पादन शुल्क विभागाने निर्गमित केले आहेत.

## यात्रा महोत्सवात आज कुस्ती स्पर्धे चे आयोजन विजेत्यांना मिळणार भरघोस बक्षिसे

लातूर/प्रतिनिधी: ग्रामदैवत श्री सिद्धेश्र्वर



व रत्नेश्र्वर देवस्थानच्या यात्रा महोत्सवानिमित्त रविवार दि.२४ मार्च रोजी भव्य कुस्ती स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेतील विजेत्यांना भरघोस बक्षिसे दिली जाणार आहेत.

कुस्ती स्पर्धा हे श्री सिद्धेश्र्वर व रत्नेश्र्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवाचे आकर्षण असते. मराठवाड्यातील व राज्यातील नामवंत मल्ल या स्पर्धेत सहभागी होतात.यावर्षी रविवारी दुपारी २ वाजल्यापासून स्पर्धेस सुरुवात होणार आहे.या स्पर्धेतील विजेत्यास देवस्थानच्या वतीने विलासराव देशमुख साहेब यांच्या स्मरणार्थ श्री सिद्धेश्र्वर केसरी चांदीची गदा बक्षीस म्हणून दिली जाणार आहे. याशिवाय लातूर शहर मनपा तसेच गोपे परिवार व कोकाटे परिवाराकडूनही विजेत्या मल्लास चांदीचे कडे देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेतील विजेत्या मल्लांना रोख स्वरूपाची बक्षीसेही दिली जाणार आहेत.

लातूर व परिसरातील मल्लांनी स्पर्धेत सहभाग नोंदवावा.कुस्ती शौकिनांनी या स्पर्धेचा आनंद लुटण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांनी केले आहे. यावर्षी होणाऱ्या कुस्ती स्पर्धेचे देवस्थानच्या वतीने फेसबुक पेजवरून थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. देवस्थानच्या ाळववहशीहुरींरींपशीहुरीश्ररींी या पेजवरून हे थेट प्रक्षेपण पाहता येणार आहे.ज्या ज्यांना स्पर्धा पाहण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहता येणार नाही त्यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून या स्पर्धेचा आनंद घ्यावा,असे देवस्थानच्या वतीने कळविण्यात आले आहे.




## दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा दिल्लीकरांना खास संदेश

नवी दिल्ली, : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित मद्य घोटाळा प्रकरणी राऊस एव्हेन्यू कोर्टाने ईडीच्या कोठडीत पाठवले. आम आदमी पार्टी या कारवाईला सतत चुकीचे म्हणत आहे. आता मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल यांनी माध्यमांसमोर आपले मत मांडलय. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री केजरीवाल यांचा संदेश वाचून दाखवला. ज्यात मुख्यमंत्री केजरीवाल यांनी म्हटलेय की,'जिंदगी के हर पल देश को समर्पित

मैं जल्द ही बाहर आऊंगा

जल्द ही सारे किये वादे पूरे करूंगा

समाजसेवा का काम नहीं रुकना चाहिए'

सुनीता केजरीवाल यांनी पती अरविंद केजरीवाल यांचा संदेश एकूण ३ मिनिटे १३ सेकंदात वाचून दाखवला. सुनीता केजरीवाल यांनी सांगितलं की, मी अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी असून आज तुरुंगातून तुमचा मुलगा, तुमचा भाऊ अरविंद केजरीवाल यांनी तुम्हाला दिलेला संदेश वाचण्यासाठी पुढं आली आहे. काय आहे संदेश : ''माझ्या प्रिय देशबांधवांनो, मला काल अटक करण्यात आली. मी आत असो किंवा बाहेर, मी प्रत्येक क्षणी देशाची सेवा करेन. माझ्या आयुष्यातील प्रत्येक क्षण देशासाठी समर्पित आहे. माझ्या शरीरातील प्रत्येक अवयव देशासाठी आहे. माझा जन्म संघर्षासाठी झाला. मी आजपर्यंत खूप संघर्ष केलाय आणि भविष्यातही माझ्या आयुष्यात मोठे संघर्ष लिहिलेले आहेत. म्हणूनच या अटकेमुळं मला आश्चर्य वाटत नाही. मला तुमच्याकडून खूप प्रेम मिळालय. भारतासारख्या महान देशात माझा जन्म झाल्यामुळं मी माझ्या मागील जन्मात खूप चांगली कामं केली असतील. आपल्याला एकत्र भारताला पुन्हा एकदा महान बनवायचं आहे. भारताच्या आत आणि बाहेर अशा शक्ती आहेत ज्या भारताला कमकुवत करत आहेत. सतर्क राहून या शक्ती ओळखल्या पाहिजेत. या शक्तींचा पराभव करायचा आहे. भारतात असे अनेक लोक आहेत, ज्यांना भारताला पुढं न्यायचं आहे. आपल्याला या शक्तींशी जोडलं पाहिजे आणि त्यांना आणखी मजबूत करावं लागेल.'' यानंतर सुनीता केजरीवाल म्हणाल्या की, अरविंद केजरीवाल हे लोहासारखे मजबूत आहेत. केजरीवाल लवकरच देशाला दिलेलं प्रत्येक वचन पूर्ण करतील. लोकांच्या प्रार्थना अरविंद केजरीवाल यांच्यासोबत आहेत. ''माझ्या दिल्लीतील आई आणि बहिणी विचार करत असतील की केजरीवाल आत गेले आहेत, मला माहीत नाही त्यांना हजार रुपये मिळतील की नाही? मी सर्व माता भगिनींना आवाहन करतो की त्यांनी आपल्या भावावर आणि मुलावर विश्वास ठेवावा. तुमच्या भावाला आणि तुमच्या मुलाला जास्त काळ आत ठेवू शकतील अशा कोणत्याही भिंती नाहीत. मी लवकरच बाहेर येईल आणि मी माझे वचन पूर्ण करेल. केजरीवाल यांनी आश्वासन दिले आणि ते पूर्ण केलं नाही असं आजपर्यंत कधी घडलं आहे का? तुमचा भाऊ, तुमचा मुलगा लोखंडाचा बनलेला आहे आणि खूप मजबूत आहे. माझी फक्त एकच विनंती आहे, कृपया एकदा मंदिरात जा आणि माझ्यासाठी देवाचा आशीर्वाद घ्या. करोडो लोकांच्या प्रार्थना माझ्या पाठीशी आहेत. ही माझी ताकद आहे. आम आदमी पार्टीच्या सर्व कार्यकर्त्यांना माझं आवाहन आहे की माझ्या अटकेमुळं समाजसेवा आणि जनसेवेचे कार्य थांबू नये, आणि हो यामुळं भाजपवाल्यांचा द्वेष करु नये. ते सर्व आमचे भाऊ-बहिणी आहेत. मी लवकरच परत येईन, तुमचेच अरविंद केजरीवाल.''यावेळी सुनीता केजरीवाल यांच्या चेहऱ्यावर काळजी स्पष्ट दिसत होती. तसंच या संदेशाद्वारे त्यांनी दिल्लीतील जनतेला मुख्यमंत्री केजरीवाल यांच्यावर विश्वास ठेवण्याचं आवाहनही केलेय.

## नवी दिल्ली येथे निवासी आयुक्त रुपिंदरसिंग यांच्या हस्ते 'लोकसभा पूर्वपीठिका -२०२४' चे प्रकाशन

नवी दिल्ली,: लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या पार्श्र्वभूमीवर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने तयार करण्यात आलेली महाराष्ट्रातील सर्व लोकसभा मतदारसंघांच्या माहितीवर आधारित पूर्वपीठिकेचे प्रकाशन, महाराष्ट्र सदनचे निवासी आयुक्त रुपिंदरसिंग यांच्या हस्ते करण्यात आले.

निवासी आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात पूर्वपीठिकेचे प्रकाशन झाले. सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश आडपावार यावेळी उपस्थित होते.

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी पूर्वपीठिकेच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण संदर्भ उपलब्ध झाले आहेत. ही संदर्भ पुस्तिका सर्वांसाठीच उपयुक्त ठरणारी आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने घेतलेल्या पुढाकाराबद्दल समाधान व्यक्त करताना निवासी आयुक्त रुपिंदरसिंग म्हणाले की, माध्यम प्रतिनिधी तसेच निवडणुकीशी संबंधित असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना ही पुस्तिका तात्काळ संदर्भासाठी उपयुक्त ठरणार आहे. ही संदर्भ पुस्तिका अल्पावधीत व परिपूर्ण माहितीसह सुबक पद्धतीने तयार केल्याबद्दल त्यांनी महासंचालनालयाचे कौतुक केले.

राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाअंतर्गत कार्य करणाऱ्या महाराष्ट्र परिचय केंद्राच्या स्थापनेपासूनच राष्ट्रीय प्रसारमाध्यमे आणि दिल्लीस्थित महाराष्ट्रातील प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना लोकसभा मतदारसंघांविषयी साद्यंत माहिती देणारी पूर्वपीठिका प्रकाशित करण्यात येते. यावर्षीही १८व्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर पूर्वपीठिका प्रकाशित करण्यात आली आहे. माध्यम प्रतिनिधी व लोकसभा निवडणुकीतील विविध अधिकाऱ्यांना ही पुस्तिका संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडेल.

## पारदर्शक, निष्पक्ष व निर्भय निवडणुकांसाठी प्रशिक्षित कर्मचारी आवश्यक

छत्रपती संभाजीनगर, (जिमाका):- लोकसभा निवडणूक २०२४ च्या कामकाजाची पूर्वतयारी म्हणून निवडणूक अधिकारी कर्मचाऱ्यांनी आपल्याशी संबंधित विषयांच्या नियमांचा अभ्यास व्हावा म्हणून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी 'वाचन लेखन दिवस' अंमलात आणण्याचे निर्देश दिले होते. त्यास प्रतिसाद देत आज जिल्हा प्रशासनाने 'एक दिवस अभ्यासाचा' हा अनुभव घेतला. 'पारदर्शक, निष्पक्ष व निर्भय निवडणुकीसाठी कर्मचारी-अधिकारीप्रशिक्षित असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी स्वामी यांनी सहभागी कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना व्यक्त केले. जिल्ह्याभरात तब्बल १००० हून अधिक अधिकारी-कर्मचारी या उपक्रमात सहभागी झाले.

निवडणूक पूर्वतयारीचा भाग म्हणून प्रत्येक नोडल अधिकारी, त्यांचे अधिनस्त कर्मचारी, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांना सोपविण्यात आलेले कामकाज बिनचूक व वेळेत व्हावे यासाठी कामकाजाच्या विषयाच्या नियमांचा अभ्यास करावा, आणि आपापल्या विषयात पारंगत व्हावे, ही भूमिका घेत जिल्हाधिकारी स्वामी यांनी जिल्हा निवडणूक यंत्रणेने वाचन लेखन दिवस साजरा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा मुख्यालयापासून ते तालुकापातळीवर प्रत्येक ठिकाणी अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी वाचन लेखन व्यवस्था करण्यात आली होती.

## मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी महिलांनी पुढे यावे

अमरावती, (जिमाका) : महिला शक्ती ही कोणत्याही गोष्टीत परिवर्तन घडवून आणू शकते. महिलांनी मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवल्यास



जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी निश्र्चितच वाढेल त्यासाठी सर्व महिलांनी पुढे यावे असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले. अमरावती जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रशासनामार्फत वेगवेगळ्या पातळीवर प्रयत्न सुरु आहेत. जिल्हा आणि तालुका पातळीवर मतदान जनजागृती करण्यासाठी मतदार जागृती कक्ष स्थापन करण्यात आले असून गावागावात मतदार जनजागृती करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मोर्शी येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, एएनएम, शिक्षिका आणि बचत गटांची महिला यांचा 'द पिंक फोर्स' जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते स्थापन करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. मागच्या वेळीच्या लोकसभेच्या तुलनेत यावर्षी मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जिल्हा स्तरावरून मतदारांना वेगवेगळ्या प्रकारे आकर्षित करण्यात येत आहे.

## पीएम मोदींच्या राईट हँड ईडीने जेपी नड्डांना अटक करावी; गंभीर आरोप करत 'आप'कडून जाहीर आव्हान

नवी दिल्ली : आम आदमी पार्टीने (आप) दिल्लीतील कथित दारू घोटाळ्याबाबत मोठा दावा केला आहे. शनिवारी (२३ मार्च) आप मंत्री आणि पक्षाचे नेते आतिशी यांनी या प्रकरणाचा मनी ट्रेल समोर आल्याचे म्हटले आहे. हा सर्व पैसा भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) खात्यात गेला आहे. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या राईट हँड ईडीला या प्रकरणात भाजपला आरोपी बनवून भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांना अटक करण्याचे आव्हान देत असल्याचे म्हटले आहे. ईडीकडून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली असून त्यांना पीएमएल कोर्टाकडून २८ मार्चपर्यंत ईडीची कोठडी सुनावण्यात आली आहे.

तथाकथित घोटाळ्याखाली अटक करण्यात आल्याचेही आतिशी यांनी सांगितले. केवळ एका व्यक्तीच्या जबाबाच्या आधारे त्याला अटक करण्यात आली आहे. शरदचंद्र रेड्डी असे या व्यक्तीचे नाव असून ते औषध निर्मिती कंपनी अरबिंदो फार्माचे मालक आहेत. दिल्लीच्या अबकारी धोरणात शरदचंद्र रेड्डी यांनाही काही दुकाने मिळाली. त्यांना चौकशीसाठी बोलावण्यात आले होते आणि त्यांनी स्पष्टपणे सांगितले की मी केजरीवाल यांना कधीही भेटलो नाही किंवा आमचा आपशी काही संबंध नाही. असे सांगताच त्यांना दुसऱ्याच दिवशी ईडीने अटक केली. अनेक महिने तुरुंगात राहिल्यानंतर, एके दिवशी रेड्डी यांनी आपले विधान बदलले आणि सांगितले की आपण केजरीवालांना भेटलो होतो आणि दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांशीही दारू घोटाळ्यावर बोललो होतो पण हे फक्त विधान आहे पण पैसा कुठे आहे?

आप च्या पत्रकार परिषदेदरम्यान, आतिशी यांनी दावा केला की शरथ रेड्डी यांच्या कंपन्यांनी निवडणूक बाँडद्वारे भाजपच्या खात्यात पैसे दिले आहेत. आधी साडेचार कोटी आणि नंतर अटकेनंतर ५५ कोटी रुपये भाजपला देण्यात आले. मी पंतप्रधान मोदी आणि ईडीला आव्हान देतो की आता दारू घोटाळ्यात मनी ट्रेल आहे. ईडीने भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांना अटक करावी.

## 'जर आम्ही ठरवले तर ४ ते ५ मिनिटात,' महायुतीतील जागावाटपावर चंद्रशेखर बावनकुळे स्पष्टच बोलले

मुंबई : लोकसभा निवडणुकीचे रणशिंग वाजले असून अद्यापही महायुती आणि महाविकास आघाडीकडून सर्व मतदारसंघातील उमेदवारांची घोषणा करण्यात आलेली नाही. महायुतीमध्ये एकीकडे काही मतदारसंघांवरुन तिढा निर्माण झालेला असताना मनसे सहभागी होत असल्याने जागावाटपाला उशीर होत असल्याची चर्चा आहे. मात्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा दावा फेटाळला आहे. आम्ही ठरवलं तर ४ ते ५ मिनिटात चर्चा संपेल असं ते म्हणाले आहेत. ''आमचा तिढा नाही. आमच्यात चर्चा सुरु आहे. ती ५ ते १० मिनिटात संपू शकते,'' असं त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले. ''जागावाटपाबाबत २ ते ३ दिवसांत चित्र स्पष्ट होईल. महायुती म्हणून आम्ही १३ पक्ष एकत्र निवडणूक लढणार आहोत. बूथवर आम्ही लक्ष केंद्रीत केलं आहे. ५१ टक्के मतं मिळतील अशी आम्हाला आशा आहे. नरेंद्र मोदींनी सुरु केल्या योजना आणि महाराष्ट्राला केलेली मदत यामुळे आम्हाला मतं मिळतील. काँग्रेसची ६५ आणि मोदींची १० वर्ष यांची तुलना केल्यास मोदींची १० वर्ष वरचढ ठरतात. जनतेलाही विकसित भारतासाठी मोदींना साथ दिली पाहिजे हे आता समजलं आहे,'' असं चंद्रशेखर बावनकुळेंनी सांगितलं आहे. मागील निवडणुकीच्या तुलनेत ७ ते ८ टक्के वाढतील असं दिसत असल्याचंही त्यांनी सांगितलं. तसंच अमरावतीची जागा भाजपाच लढणार असून, भाजपाचाच उमेदवार असेल असंही स्पष्ट केलं. ''कोण प्रवेश करणार, कोण नाही यापेक्षा अमरावतीची जागा भाजपाच लढणार, भाजपाचाच उमेदवार असेल हे महत्वाचं आहे. आनंदराव अडसूळ, बच्चू कडू या सर्वांची मदत घेऊन आणि १०० टक्के जिंकू. सर्व घटक पक्षांची मदत घेऊ आणि ते करतील असा विश्वास आहे,'' असे ते म्हणाले. ''अशा अनेक जागा आहे जिथे शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादीची प्रत्येकाची ताकद असून उमेदवार जिंकू शकतो. सर्वांचे महत्व लक्षात घेऊनच जागावाटप केले जाईल. एकनाथ शिंदे, अजित पवार यांची प्रतिष्ठा राखत त्यांना सोबत ठेवायचे ही भाजपाची भूमिका आहे. ४ ते ५ मिनिटांत चर्चा संपेल इतके सोपे आहे. आम्ही चाचपणी करत असून, राज्य आणि केंद्रातील नेतृत्व पुढाकार घेत जागावाटप करत आहे,'' असे चंद्रशेखर बावनकुळेंनी सांगितले.

## लोकसभा सार्वत्रिक निवडणूक मतदानासाठी 'इपिक'सह बारा ओळखपत्र ग्राह्य

नागपूर, : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता निवडणूक आयोगाने मतदान करण्यापूर्वी मतदारांची ओळख पटविण्याकरिता मतदान ओळखपत्रासह (EPIC) १२ प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरलेले आहे.

नागपूर आणि रामटेक लोकसभा क्षेत्रात १९ एप्रिलला मतदान होणार आहे. या पार्श्र्वभूमीवर मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी स्वतःची ओळख पटविण्याकरिता निवडणूक आयोगाने बारा प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरले आहे. त्यामुळे आता लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करताना मतदारांची ओळख पटविणे शक्य होणार आहेत.




या ओळखपत्रात आधार कार्ड, मनरेगा जॉब कार्ड, बँक व पोस्ट ऑफिसने जारी केलेल्या फोटोसह पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेअंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, कामगार मंत्रालयाने जारी केलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्तऐवज, केंद्र व राज्य सरकार / पीएसयू / पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना दिलेली छायाचित्र असलेली सेवा ओळखपत्रे, खासदार, आमदार यांना जारी केलेल्या अधिकृत ओळखपत्रांचा समावेश आहे. यामुळे लोकसभा निवडणुकीत मतदारांना मतदान करताना कोणतीही अडचण येणार नाही. ते आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील.

## 'कंस मामा भीतीमुळे तुरुंगात टाकतात, भारतात रशिया, चीनसारखी स्थिती; संजय राऊतांचा हल्लाबोल

मुंबई : शिवसेना ( उबाठा ) खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. ''ही निवडणूक भाजपासाठी अवघड आहे. त्याच भीतीमुळे कंस मामा सगळ्यांना तुरुंगात टाकतात. देशात कोणीही सुरक्षित नाही. कोणालाही अटक होऊ शकते. भारतात रशिया आणि चीनसारखीच स्थिती आहे. लोकांनी अरविंद केजरीवाल यांना मुख्यमंत्री म्हणून निवडले आहे. त्यामुळे त्यांचे भवितव्य लोकच ठरवतील,'' असेही खासदार संजय राऊत यांनी यावेळी सांगितले. ''आमचे सरकार आल्यावर कोण कारागृहात जाईल, हे पाहा,'' असेही त्यांनी यावेळी सांगितले.

'कंस मामाला भीती वाटल्याने कारागृहात पाठवत आहे' : ''कंस मामाला ज्यांची भीती होती, त्या सगळ्यांना त्याने तुरुंगात टाकले. कंस मामाने देवाला देखील तुरुंगात टाकले होते. श्रीकृष्णाचा जन्म झाला आणि कंसाचा वध केला. कंस मामाला भीती वाटत आहे, त्यामुळे विरोधकांना तुरुंगात टाकत आहेत,'' असा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला.

रशिया आणि चीनसारखी भारतात स्थिती : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना बेकायदेशीर आणि बदल्याच्या भावनेतून खोट्या केस मध्ये अटक केली, हे सर्व जण जाणत आहेत. विश्वगुरू देखील जाणत आहेत. दिवसेंदिवस त्यांना भीती वाटत असून जंगल राज सुरू आहे. जसे रशिया आणि चीनमध्ये सुरू आहे, तसे इथे देखील सुरू आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना पूर्ण बहुमतानं निवडून आले आहेत. तिथे भाजपाला ५ च्या वर जागा जिंकता आल्या नाहीत. अरविंद केजरीवाल कारागृहातून देखील काम करू शकतात. अरविंद केजरीवाल यांना लोकांनी निवडून आणले, ईडी सीबीआय यांनी नाही, असा हल्लाबोल संजय राऊत यांनी केला.

## दिव्यांग मतदारांना 'सक्षम'ची मदत

रायगड जिमाका- लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने जे ४० टक्क्यांहून अधिक दिव्यांग आहेत, अशा व्यक्तींसाठी आणि ८५ वर्षे पूर्ण झालेल्या वयोवृद्धांना मतदान प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टीने सुरू केलेल्या 'सक्षम' ॲपच्या माध्यमातून अधिकच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

या 'सक्षम' ॲपवर दिव्यांग मतदारांसाठी दिव्यांग म्हणून नोंदणी करण्याची, नवीन मतदार नोंदणीसाठी, मत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हस्तांतरित करणे, मतदान केंद्र बदलाची व व्हील चेअरची विनंती करता येत असून मतदार यादीत नाव शोधण्याची, मतदान केंद्र जाणून घेणे, तक्रारी नोंदविणे, मतदान अधिकारी शोधणे, बूथ लोकेटर स्थिती तपासणे इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.रायगड मतदारसंघात एकूण ८ हजार ४६ दिव्यांग मतदार आहेत. यापैकी २ हजार ९३३ महिला तर ५ हजार १३३ पुरुष मतदार आहेत.

## भटक्या श्वानांना मांस खाऊ घालणाऱ्या महिलेविरोधात गुन्हा दाखल

मुंबई : मुंबईत महालक्ष्मी मंदिराजवळ भटक्या प्राण्यांना मांस खाऊ घालणाऱ्या ४० वर्षीय महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गावदेवी पोलिसांनी हा गुन्हा दाखल केला आहे. महिलेवर 'प्रार्थनास्थळाची विटंबना' तसंच स्थानिकांच्या धार्मिक भावना दुखावल्याचा' आरोप ठेवण्यात आला आहे. स्थानिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर महापालिकेचे दोन पशुवैद्यकीय अधिकारी आणि दोन पोलिस अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली होती. या महिलेला भटक्या प्राण्यांना मांस खाऊ न घालण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

मात्र, सूचनांचे पालन न केल्याने तिच्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करम्यात आली. धार्मिक स्थळाचे नुकसान आणि अपवित्र करणे, शांतता भंग करणे आणि गुन्हेगारी धमकी देणे यासह कठोर कलमांतर्गत तिच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने या वृत्ताला दुजोरा देत दिलेल्या माहितीनुसार, ''आम्ही संबंधित महिलेला अद्याप अटक केलेलं नाही. आम्ही तक्रारदाराने दिलेली माहिती पडताळत आहोत. महालक्ष्मी आणि धाकलेश्वर मंदिरातील भाविकांच्या रांगा लागलेल्या असताना महिला मुद्दामून रस्त्यावर भटक्या प्राण्यांना मांस खाऊ घालत होती असा तक्रारदाराचा दावा आहे''. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सामाजिक कार्यकर्त्या शीला शहा यांच्या तक्रारीवरून नंदिनी बेलेकर आणि पल्लवी पाटील या दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## झरोका

एक – साधा नमस्कार केलात तरी चालेल पण हळूहळू तूम्हाला पूर्वीच्या पक्षातील सवयी, विसराव्याच लागतील तरच तूम्हाला न्याय मिळेल याची खात्री फूटीर शिवसेना नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्यांच्या इच्छूक उमेदवाराना सल्ला देत आहेत तर तेच बंडखोर भाजपनेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे ही आमचे काय म्हणून आर्जव करीत आहेत हे गौडबंगाल काय हेच कळत नाही. डोकं भरकटत चालले आहे.

दुसरा – अरे, हे असेच होणार झाले. राजकीय संसार मोडून दुसऱ्यांची संगत केली तर असेच होते असते. सवत घरात आली तर काय होते हे सांगण्याची गरजच नसने तसेच हे राजकीय पक्षाचे होत असते समजले.

एक – अहो, राष्ट्रवादी फूट पडली तरी शरद पवार बिनधास्त आहेत ते घरवापसीला सहमती देताना दिसतात मग एकनाथ शिंदे हे कोणावर मदार ठेवून आहेत हेच कळत नाही.

दुसरा – अरे, एकनाथ शिंदे फक्त मुख्यमंत्री होऊ पाहात होते त्यांचे स्वप्न पूर्ण झालं. मराठवाड्याचा पेच त्यांच्या समोर आहे. एकास एक चढ बंडखोर शिवसैनिक उमेदवारीसाठी भाया सारुन उभे आहेत त्यांना ठाकरी आवाज नाही मग शिंदे काय करणार म्हणून तेच बिळावरचा नाग बनून चावा घेण्याचा प्रयत्न करीत असले तरी नरडीवर घाव घालण्यासाठी भाजपा, तयार असल्याने त्यांची पंचाईत होते आहे, दुसरे काय.

एक – अहो, मग हिंदूत्वावचा नावावर भाजपाला साथ दिलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे काय होणार याची काळजी वाटतेय. कांहीच कळत नाही, डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, आलीया भोगाशी तशीच सत्ताकळा भोगावी लागेल या विना दुसरा पर्याय असा काय असू शकतो सोबतदाराना सांभाळणे, गोंजारणे स्वतःची खूर्ची मजबूज करणेशिवय दुसरा विकल्प असूच शकत नाही.

एक – अहो, मग उद्याच्या लोकसभा निवडणूकीत बंडखोर शिवसेना, राष्ट्रवादीचेकाय होईल मती गुगं झालेय. त्याचे काय.

दुसरा – अरे, भाजपाला स्वतःचे अस्तित्व टीकवायचे पडलेले आहे त्यामूळे मित्रपक्षाला न्याय देणे, निवडून आणणे हे त्यांचे कर्तव्य ठरतेच पण कॉग्रेस महाविकास आघाडीच्या खेळात सर्वच मित्र पक्ष आणी शरद पवार यांची खेळी आणी मतदाराचा न्यायीक कौल यावरच लोकशाही,संविधानाचे वैभव टीकून आहे तेच पाहाणे आपल्याहाती आहे दुसरे काय.

## काय बोलता राव ?

लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू असली तरी रोजगारहमीची कामे,शेतकरी, शेतमजूर, कामगार, बाराबलूतेदाराचा कामाला बंदी नाही असे निवडणूक आयोगाने जाहीर केले असून जेष्ठ नागरीक, संजयगांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, वगैरे योजनांच्या निधी वाटपाला मोकळीक दिली असताना मराठवाड्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतील कामे बंद केल्याने मराठवाड्यातील दोन लाख ४५ हजार कामगारवर उपासमारीची वेळ आल्याचे एका उपजिल्हाधिकारी पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याने स्पष्ट केले आहे.

**काय बोलता राव,**

अरे, निवडणूक आयोगाने गोरगरीब, वंचित, कामगार, मजूरासंदर्भात आचारसंहितातून सूट दिली असली तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी शासकीय यंत्रणाना आदेश देवून ही सर्व कामे बंद करुन वेगळ्या मार्गाने त्याना साधनसुचिता देण्याची तजबीज केली असावी. पण ही कामे लाभाची असल्याचे कारण सांगून संबंधीत गटविकास अधिकारी हे काम व दाम रोखून ठेवत असल्याची राजकीय वर्तूळात कुजबूज होताना दिसते आहे मग गोरगरीबाना मजूरीपासून वंचित ठेवून निवडणूक प्रचारात उतरविण्याचा भाजपाचा, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याचा डाव तर नसावा मग बोला दाजीबा.

## महान क्रांतिकारकांचा आदर्श तरूण पिढीनी घ्यावा दयानंद विज्ञानमध्ये शहीद दिनानिमित्त विनम्र अभिवादन

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात



दि.२३ मार्च २०२४ रोजी शहीद दिनानिमित्त प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य आर.एच.लड्ढा यांनी भारत मातेचे वीर सुपुत्र,महान क्रांतिकारक भगतसिंग,राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.याचबरोबर शहीद दिनानिमित्त देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जिवाची बाजी लावणारे महान क्रांतिकारक,थोर देशभक्त,भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा पहिला आदर्शवाद मांडणारे,ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा देणारे,देशाच्या स्वातंत्र्यासाठी हसत हसत आपल्या प्राणाचे बलिदान देणारे,आपल्या पिढीला गुलामगिरीतून स्वातंत्र्य मिळावे यासाठी प्रयत्न करणारे आणि तरुणांसाठी आदर्श प्रेरणास्त्रोत असलेल्या महान क्रांतिकारकांचा आदर्श भारतीय तरूण पिढीनी घ्यावा यासाठी प्राचार्य आर.एच.लड्ढा यांनी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,पर्यवेक्षक डॉ.वैशाली पाटील,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,विनोद घार,सतिश तांदळे,मोहसीन शेख,किशोर जाधव,सुदाम सातपुते,ज्ञानदेव माळी,बाबासाहेब बचाटे,अमोल क्षीरसागर,अर्चना शर्मा यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# लोकसभा उमेदवारीतून वाद !

## संपादकीय...

भाजपा महायुती आणि भाजपाविरोधी इंडिया महा विकास आघाडीत उमेदवारीतून पक्षांतर्गत वाद निर्माण झाले असून एकास एक तुल्यबळ उमेदवार देण्याचा पक्षीय राजकारणामुळे तमाम राजकीय पक्षातील कार्यकर्ते एकमेकांचे उणे- धुणे काढीत असून कार्यकर्त्यांना डावलुन नवीन उमेदवार देण्याच्या पक्षाने त्याच्या निर्णयामुळे कार्यकर्त्यात नाराजी निर्माण झाल्याचे चित्र दिसते आहे.

काँग्रेसची गेल्या दहा वर्षातील झालेली पीछेहाट आणि संबंधित लोकसभा मतदार संघात भाजपाविरोधी तुल्यमूल्य उमेदवार देण्यासाठी काँग्रेसची दमछाक होत असून शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गट-तट पडल्याने आजवर एकत्र काम केलेले नेते लोकसभा निवडणुकीत एकमेका विरोधात निवडणूक लढवीत असल्याने मतदारही संभ्रमात पडल्याचे दिसते आहे. नागपूर, अमरावती, अकोला, मुंबई ,पुणे, औरंगाबाद येथील परिस्थिती अधिक बिकट दिसते आहे. अनेक लोकसभा मतदारसंघात एकावर एक वरचढ उमेदवार असल्याने पक्षश्रेष्ठी समोर पेज पडला असून एकालाच उमेदवारी इतरांची नाराजी दूर करण्यासाठी कसरत करावी लागते आहे.

शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसच्या बंडखोरीमुळे महाराष्ट्रातील भाजपा-शिंदे गट, अजित पवार गट आणि शरद पवार गटाच्या विरोधात कोणास उमेदवार द्यावा. त्यासाठीची कसरत होत असली तरी अनेक ठिकाणी सक्रिय कार्यकर्त्यांना डावलून नवीन ताकतवान-पैसेवाला शहरात देण्याचा-प्रयत्न सर्व पक्षातून होताना दिसतो आहे. लातूर लोकसभा राखीव मतदार संघात भाजपने विद्यमान खासदार सुधाकर शृंगारे यांनाच उमेदवारी दिल्याने काँग्रेसला या ठिकाणी उमेदवार देताना चक्क सक्रिय कार्यकर्त्यांना डावलून केवळ पैसेवाला म्हणून वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर शिवाजी काळगे यांना उमेदवारी द्यावी लागली परंतु माजी,आजी कार्यकर्ते नाराज झाल्याची चित्र दिसत असून प्रचार-प्रसारात मनापासून कार्यकर्ते सहभागी होतील याबद्दल शंखास्पद कुजबूज होत असून शृंगारे यांचाच विजय निश्चित असल्याची कुजबूज होताना दिसते आहे. लातूर लोकसभा राखीव मतदार संघातून अपक्ष उमेदवार भरणा अधिकचा दिसतो आहे अनेक सामाजिक राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते अपक्ष म्हणून लातूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दाखल करणार असून लातूरचे माजी नगरसेवक आणि पत्रकारितेत कार्यरत असलेले रघुनाथ बनसोडे यांनी तर पत्रकार परिषद घेऊन उमेदवारी जाहीर केल्याने त्यांच्या मागे कोण कोणाचे हात आहेत या संदर्भात ही राजकीय वर्तुळात चलविचल होताना दिसते आहे त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक मतदारसंघातून राजकीय पक्षांना पराभवाची धास्ती लागल्याचेच चित्र दिसते आहे.

भाजपची प्रचार-प्रसार यंत्रणा, साम-दामचा वापर आणि प्रशासकीय यंत्रणेचा गैरवापर यातून काँग्रेस-ठाकरे सेना आणि शरद पवार चे राष्ट्रवादी काँग्रेस भाजप पुढे कशी तग धरते, मतदाराचा कौल कोणाकडे यावरच सारे अवलंबून असल्याने अपक्षाच्या मत विभागणीतून कोणाचे भाग्य उजळले हे सांगणे कठीण आहे असून मराठा आरक्षण सध्या सोयऱ्याच्या नोंदी, ओबीसीतूनच मराठा आरक्षण असा आग्रह धरून बसलेल्या जरंगे पाटील हे निवडणूक प्रक्रियेत काय भूमिका घेतात यावरही बरेच काही अवलंबून असून लोकसभा निवडणुकीतील उमेदवारीतून पक्षांतर्गत वाद बंडखोरी आणि भाजपा काँग्रेसच्या रेटारेटीत शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटबाजीत मतदाराचा कौल हाच निर्णायक ठरू शकतो अशीच लोक प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे ती चिंताजनक वाटते.

सर्वच राजकीय पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये काम करायला आम्ही आणि ऐनवेळी उमेदवारी दुसऱ्याला अशी संताप जनक प्रतिक्रिया उलट असून कोणाचे ओझे कोणाच्या खांद्यावर घ्यायला आम्ही पाळीव गाढव नाहीत, कार्यकर्ते आहोत ही ते त्यांनी लक्षात घ्यावे असाही सूर आवळला जात असून फक्त बळकट करणे, उमेदवार विजयी करणे, कार्यकर्त्यांची नाराजी दूर करणे, मतदाराची समजूत काढणे, त्यांना त्यांच्या न्याय हक्काची ग्वाही देणे, वगैरे मशागत करण्याची वेळ सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यावर येऊन ठेपली असून लोकसभा निवडणुकीतील उमेदवारीतून उपक्रम केलेला वाद रामविणे हीच एक कसरत आहे असे वाटते.

## बाबासाहेबांनी सांगितलेली एक गोष्ट तीन बैल एक वाघ

वंचित बहुजन आघडी आणि शिवसेना यांची युती झाली असे आपण वृतपत्रात वाचत आलो.वृतवाहिन्यावर बेकिंग न्यूज पाहत आलो.समाजात एक चांगला संदेश गेला. प्रबोधनकार ठाकरे यांचा नातू आणि विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा नातू एकत्र येऊन निवडणुका लढणार हा वैचारिक क्रांतिकारी बदल राज्यातील नागरिकांना मोठा धक्का देणारा ठरेल अशी स्वप्न पडायला लागली.महाविकास आघाडीत वंचित नसला तरी शिवसेने सोबत असेल असे अंदाज सर्वच जाणकार बांधायला लागले.पुढे काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांची महाविकास आघाडी वंचित समाजाचे नेतृत्व करणाऱ्या वंचित बहुजन आघडीला कशी स्वीकारेल ही मोठी समस्या होती. कारण या तिन्ही पक्षातील जात दांडगे धन दांडगे मराठे म्हणजेच रक्त पिणारे वाघ आहेत. ते वंचित समाजाच्या गरीब बैलांना आपल्या सत्तेच्या कुरणात घुसू देतील हे शक्य वाटत नव्हते.परंतु राजकारणात कधी ही काही होऊ शकते.शेवटी राजकारण असते.ते संधी वर मात करून करावे लागते.अशा वेळी बाबासाहेबांनी सांगितलेली एक तीन बैल एक वाघ यांची गोष्ट मला आठवली ती इथे वाचका समोर मांडतो.

१९५२ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर कायदे मंत्री पदाचा राजीनामा देऊन केंद्रीय मंत्री मंडळालातून बाहेर पडले होते.तेव्हा निपाणी जिल्हा.बेळगाव कर्नाटक या ठिकाणी त्यांची एका दिवशी सभा होती त्या दिवशी दुपारी ३:०० वाजता बाबासाहेब आले.तिथे त्यांनी तीन बैलांमध्ये वाघाने कशी बेकी केली,ती गोष्ट पुढील प्रमाणे बाबासाहेबानी सांगितली होती.महाविकास आघाडी त्यातील सर्व घटक पक्ष आणि वंचित आघाडी यातील जागा वाटप करण्याच्या बैठकीत वंचितला मिळणारी वागणूक ही या वाघ व तीन बैलाच्या गोष्टीशी जुळणारी आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भाषनाला सुरुवात करण्यापूर्वी सर्व जनसमूदायावर नजर टाकली,आणि धिरगंभीर आवाजात म्हणाले,माझ्या बंधू आणि भगनीनो ! तुमच्या उद्धारासाठी मला ज्या ज्या मार्गाने व जे जे करता येणे शक्य होते,ते मी केले आहे. तुम्हास जे सांगावयाचे होते,ते मी सांगितले आहे.या पुढे तुम्हाला शिक्षण,संघटना व हक्कांसाठी सतत संघर्ष करावा लागणार आहे. संघर्षाशिवाय तुम्हाला मागून न्याय मिळणार नाही.आपल्या पुढे अनेक संकटे उभी आहेत. त्यांच्याशी तुम्हाला संघटितपणे मुकाबला करावा लागणार आहे.अशा वेळी तुम्ही सर्व मागासवर्गीय जाती,जमातींनी संघटित झाले पाहिजे,तुमच्यात जर एकी झाली नाही,तर तीन बैलांच्या एकीत बेकी निर्माण करून,वाघाने त्यांचा कसा फडशा पाडला तशीच तुमची गत होईल.

एक फार मोठे कुरण होते.त्यात तीन बैल नेहमी चरावयास येत असत.ते एकमेकांचे फारच जीवलग मित्र होते.ते नेहमी एकत्र रहात,एकत्र गवत खात.एकमेकांवर प्रेम करीत.एक विचाराने वागत.एकमेकांना मदत करीत.सारी कामे एकत्र राहून एका मनाने करीत.ते बैल खूप सशक्त होते. ते खूप सुखी होते.चांगले लठ्ठ पोसलेले होते.एका वाघाने त्यांना पाहिले.त्याच्या तोंडाला पाणी सुटले.यातला एक तरी बैल आपण खावा. असे त्याच्या मनात आले.वाघ होता खूप बलवान. शिकारी करून खाणे हे त्याचे रोजचे काम. परंतु बैलांना मारून खाणे काही केल्या जमेना. कारण ते संघटितपणे रहात होते.वाघाने त्यांना मारण्यासाठी खूप प्रयत्न केला.परंतु ते तिघे एकत्रच असत.एकत्र चालून येत.तिघेही एकत्र शिंगे रोखीत आणि वाघाला 'आमच्या पुढे येऊन तर पहा' असे म्हणत.बैलांची शिंगे टोकदार होती.त्याच्या अंगात शक्ती होती.वाघाला त्यांना मारण्यासाठी हिम्मत होत नव्हती.वाघ बैलांना मारण्यासाठी रात्रंदिवस विचार करीत होता. त्याला झोप लागत नव्हती.अखेर त्याने खूप विचार केला.मनात काही बेत ठरविला.तो रानात दुसरीकडे गेला.तेथे इतर पशूना भेटला. तेथे त्या सगळ्यांशी बोलला.फक्त त्या बैलांबाबत बोलला.खोटे नाटे बोलला.चुगलीची सर्वांना गोडी असते.बहुतेकांना वाईट करणे आवडते. तेच तेच पुन्हा बोलणे आवडते.साऱ्या पशुनी तेच केले.तेही आपापसात बोलू लागले.बैलांची निंदा करू लागले.त्या बैलांच्या कुरणात गेले.एकेका बैलाला अलग अलग बोलावून त्यांच्यात बेकी कशी होईल.अशा प्रकारे सांगू लागले.त्याचा वाईट परिणाम झाला.त्यांचं एकमेका वरील प्रेम,विश्र्वास उडाला.त्यांना एकमेकांचा संशय वाटू लागला.ते एकमेकांचे शत्रू झाले.एकीमध्ये बेकी झाली.स्नेह होता तोही संपला.ते एक एकटे राहू लागल,फिरू लागले,एकमेकांशी बोलणे सोडून दिले.तीन बाजूनी तीन गेले.वाघाला तीन बैलांमध्ये बेकी हवीच होती.तो पुन्हा कुरणात आला.एक एकाशी अलग अलग लढला. त्याने एकेकाचा पराभव केला.त्यांचा प्राण घेतला. त्याना खाऊन टाकले. अशा तर्हेने त्याने तीन बैल फस्त केले.यातून आपण काय बोध घेणार आहोत.

तीन बैलांची एकी होती,तो पर्यत वाघ बैलांच्या वाटेला जाऊ शकत नव्हता.परंतु त्यांच्या मध्ये बेकी करून त्याने बैलांचा प्राण घेतला.आणि त्यांना खाऊन टाकले.त्याच प्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संघटनेतील कार्यकर्त्या मध्ये फूट पाडून आपल्या पक्षात घेऊन जाणारे काही राजकीय पक्ष आणि इतर काही संघटना या भारत देशात आहेत.बैलांना बुद्धी नव्हती.म्हणून त्यांच्यात वाघाने बेकी केली.परंतु आम्ही भगवान बुद्धाला मानणारे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना पूज्य मानणारे लोक,बैला सारखी बेकी करतो.आणि आपला नाश करून घेतो.मग बैलात आणि आमच्यात काय फरक आहे?.बैलानी बेकी केली नसती,तर त्यांचा प्राण गेला नसता.आम्ही जर मजबूत असलो तर जगातील कोणतीही शक्ती आमच्यात बेकी करणार नाही.बेकी झाली नाही आणि एकी असेल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या म्हणण्याप्रमाणे भारताचाच नव्हे,तर जगाचा उद्धार करू शकतो.परंतु आम्ही कमजोर आहोत.स्वार्थी आहोत.म्हणून आम्ही बेकीने राहतो.आमच्या बेकीचा फायदा इतर लोक घेतात.राजसत्ता मिळवितात आणि मजा करतात.बेकीमुळे बैलांचा नाश झाला.तसा आमचाही होत आहे.म्हणून एकीने रहा.असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहमी सांगत असत.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने घेतलेली मतदार संख्या आणि टक्केवारी अनेकांना धडकी भरणारी आहे.गेल्या वर्षभरात राज्यात वंचितच्या जाहीर सभा दखल पात्र ठरल्या आहेत. शिवसेने सोबत झालेली युती आणि आजची परिस्थिति चिंताजनक आहे. त्यामुळेच महाविकास आघाडीत वंचित कुठे असेल हे सांगता येत नाही.पण बहुजन समाजातील एकजुटीला वैचारिक गोंधळ,गैरसमज निर्माण करण्यास यशस्वी होतांना दिसत आहे. परंतु आम्ही कमजोर आहोत.स्वार्थी आहोत. म्हणून आम्ही बेकीने राहतो.आमच्या बेकीचा फायदा इतर लोक घेतात.राजसत्ता मिळवितात आणि मजा करतात.बेकीमुळे बैलांचा नाश झाला.तसा आमचाही होत आहे.म्हणून एकीने रहा.असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहमी सांगत असत.२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत एकीने मतदान करा.कुठल्याही अमिशाला बळी पडू नका. आपला खासदार निवडून येणार नाही ही मनातील भीती काढून टाका. आपली मतदार संख्या निवडणुकीत दाखवून द्या. मग आपलाच उमेदवार खासदार म्हणून निवडून येऊ शकतो. होऊ शकत नाही,शक्य नाही हे प्रथम मनातून काढून टाका.

**सागर रामभाऊ तायडे,९९२०४०३८५९ ,भांडुप,मुंबई.**

## अपप्रवृत्तीमुळे पवित्र सणाला गालबोट लागते.

होळी हा आपल्या संस्कृतीतील एक मोठा आणि महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळी मनुष्याला मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावी अशी कल्पना आहे. त्यामुळे आपले मन निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे.

या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे.

होळीचा सण साजरा करताना धांगडधिंगा घातला जातो. धुलीवंदनाच्या दिवशी तर एकमेकांना गुलाल लावण्याऐवजी रसायन मिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. काही समाज कंटक पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मारले मारतात. त्यात अनेकजण जखमी होतात. अशा घटनांत यापूर्वी काहींना आपले डोळे गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. काही महाभाग तर जाणीवपूर्वक महिलांना टार्गेट करतात. काहीजण रंगाऐवजी नासकी अंडी फेकून अंडी मारतात. काहीजण तर या दिवशी लाऊस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात.

धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. मद्यपान करूननृत्य करताना बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तीमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे.

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे,९९२२५४६२९५**

## अरविंद केजरीवालांनंतर आता मुख्यमंत्री भगवंत मान यांचा नंबर? पंजाबमधील मद्य धोरणाच्या चौकशीनंतर 'आप'मध्ये भितीचे वातावरण

नवी दिल्ली : दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी ईडीकडून दिल्लीचे मुख्यमंत्री व आपचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे. तसेच विशेष न्यायालयाने त्यांना सहा दिवसांची ईडी कोठडी सुनावली आहे. दरम्यान, अरविंद केजरीवालांच्या अटकेनंतर आता पंजाबमधील आपचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनाही अटक केली जाऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. कारण- पंजाबमधील मद्य धोरणाच्या प्रकरणातही ईडीकडून चौकशी सुरू आहे.

केजरीवालांच्या अटकेनंतर शुक्रवारी पंजाब भाजपाचे प्रमुख सुनील जाखड यांनीही पंजाबमधील मद्य धोरणप्रकरणी सखोल ईडी चौकशीची मागणी केली आहे. महत्त्वाचे म्हणजे यापूर्वी या प्रकरणी तीन अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे. त्यामध्ये वित्त आयुक्त (अबकारी) के.ए.पी. सिन्हा, वरुण रुजम व नरेश दुबे यांचा समावेश आहे. या तिन्ही अधिकाऱ्यांनी मिळून २०२२ मध्ये पंजाबमधील मद्य धोरण तयार केले होते.

आणखी एक योगायोग म्हणजे या धोरणांतर्गत पंजाबमध्ये मद्यविक्रीसाठी घाऊक परवाने (एल१) मिळालेल्या दोन कंपन्यांचे प्रवर्तक दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्यात आरोपी आहेत. तसेच पंजाबमधील धोरण ठरविताना दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या निवासस्थानी रुजम व दुबे हे दोन्ही अधिकारी उपस्थित असल्याचे ईडीच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. तर दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी मनीष सिसोदिया यांना अटक करण्यात आली आहे. त्यामुळेही विविध चर्चांना उधाण आले आहे.

या संदर्भात बोलताना पंजाबमधील एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने सांगितले, ''आमचे धोरण यशस्वी ठरले होते. त्याद्वारे आम्ही करोडो रुपयांचा महसूल जमा केला आहे. पण, केंद्र सरकार या सगळ्या बाबी कशा पद्धतीने घेते, हे येणारा काळ ठरवेल. या प्रकरणी आधीच पंजाबमधील आपच्या आमदारांवर ईडीने छापे टाकले आहेत. पुढे काय होईल, हे कोणालाही माहिती नाही.'' दरम्यान या संदर्भात बोलताना, भाजपाचे पंजाबचे प्रदेशाध्यक्ष सुनील जाखड म्हणाले, ''केजरीवाल यांना अटक झाली. त्याप्रमाणेच पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनाही अटक होऊ शकते.

## मॉस्कोमध्ये अंधाधुंद गोळीबार आणि बॉंब स्फोट, ७० ठार तर १५० जखमी; आयएसआयएस ने जबाबदारी स्वीकारली

मॉस्को : रशियाची राजधानी मॉस्कोमध्ये अतिशय भीषण दहशतवादी हल्ला झाला असून त्यामध्ये ७० जणांचा मृत्यू झाला आहे तर दीडशे जण जखमी झाल्याची माहिती आहे. शुक्रवारी,२२ मार्च रोजी संध्याकाळी, काही अज्ञात हल्लेखोरांनी रशियाच्या मॉस्को प्रांतातील क्रॅस्नोगोर्स्क येथील क्रोकस सिटी हॉलमध्ये (कॉन्सर्ट हॉल) गोळीबार आणि स्फोट घडवून आणला. मॉस्कोमध्ये झालेल्या या भीषण हल्ल्याची जबाबदारी आयएसआयएस या दहशतवादी गटाने स्वीकारली आहे. रशियाचे अध्यक्ष ब्लादिमिर पुतीन वहे पुन्हा एकदा सत्तेत आल्यानंतर हा मोठा हल्ला घडला आहे.



मॉस्कोमध्ये शुक्रवारी रात्री एक म्युझिक कॉन्सर्ट सुरू होता. त्यासाठी हजारो नागरिक आले होते. त्यावेळी अचानक सहा ते सात हल्लेखोर शिरले आणि त्यांनी अंदाधुंद गोळीबार सुरू केला. बंदिस्त ठिकाण असल्यामुळे अनेक जण जागेवरच मृत्युमुखी पडले, कारण तिथून पळण्यासाठी कुठलाही मार्ग नव्हता. १५ ते २० मिनिटं हे हल्लेखोर गोळीबार करत होते. त्यानंतर त्यांनी या कॉन्सर्ट हॉलला आग लावली, ज्यामध्ये ४० टक्के भाग जळून खाक झाला.

महत्त्वाचे म्हणजे आयसिस या दहशतवादी संघटनेनं या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. तसंच असा हल्ला होऊ शकतो याची कल्पना आम्ही रशियाला ७ मार्च रोजीच दिली होती असे अमेरिकेने म्हटलेय. हल्ल्यामागे युक्रेनचा हात नाही असा दावा देखील अमेरिकेनी केला आहे.

स्थानिक माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, गोळीबार सुरू झाल्यानंतर स्फोट झाला. मीडियानुसार, आपत्कालीन सेवांनी सांगितले की, लोकांना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. त्याचवेळी कॉन्सर्ट हॉलमध्ये लागलेल्या आगीचे व्हिडिओ सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत.

सोशल मीडियावर शेअर केलेल्या काही व्हिडीओ फुटेजमध्ये कॉन्सर्ट हॉलमध्ये गोंधळ, लोकांचा जमाव हॉलमधून पळून जाण्याचा प्रयत्न करताना आणि बंदुकीच्या गोळ्यांचा आवाजही ऐकू येतो. एका व्हिडीओमध्ये हल्लेखोरही दिसत आहेत. क्रोकस हॉलच्या छतावरून ज्वाळा उठताना दिसत आहेत.

मॉस्को क्षेत्रीय आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, या हल्ल्यानंतर ५० रुग्णवाहिका टीम क्रोकस सिटी हॉलमध्ये पाठवण्यात आल्या.मॉस्को कॉन्सर्ट हॉलच्या तळघरातून १०० लोकांना वाचवण्यात आल्याचा दावा प्रशासनाने केला.

मीडियाने दिलेल्या माहितीनुसार, मॉस्कोमधील अमेरिकन दूतावासाने क्रोकस हॉलमध्ये झालेल्या गोळीबाराच्या काही दिवसांपूर्वी संभाव्य हल्ल्याची भीती व्यक्त केली होती. अमेरिकन दूतावासाने ७ मार्च रोजी त्यांच्या वेबसाइटवर एक निवेदन प्रसिद्ध केलं होतं. दूतावास नजीकच्या भविष्यात मॉस्कोमध्ये अतिरेकी हल्ला करण्याचा विचार करत असल्याच्या अहवालांवर लक्ष ठेवत आहे आणि अमेरिकन नागरिकांनी पुढील ४८ तास गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे असे अमेरिकेने त्याच्या निवेदनात म्हटले होते.

# कु.मुग्धा गुरमे आणि कु.ओवी कोंडेकर यांनी संकलित केलेले 'आल्फाम्यानिक फेस्टिवल हे पुस्तक' विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त व प्रेरणादायी पुस्तक : प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड

लातूर : होळीची पूर्व तयारी व राष्ट्रीय जल दिनाचे औचित्य साधून इयत्ता सहावी आणि पाचवीमध्ये अभ्यास करणाऱ्या दोन मुली मुग्धा शिवचंद्र गुरमे व ओवी सागर कोंडेकर यांनी आल्फाम्यानिक फेस्टिवल नावाचे एक अत्यंत उपयुक्त असणाऱ्या पुस्तकाचे संकलन करून एक भव्य कार्यक्रमाद्वारे सनराईज नोबेल इंग्लिश स्कूल,लातूर येथे प्रकाशन केले.त्यांच्या या नाविन्यपूर्ण प्रयत्नाचे व सर्वधर्मीय सणांचे – ीं न या अनुक्रमणिकामध्ये फक्त ऋवगळता एकूण ३६ सणांची माहिती,त्यामागील शास्त्रीय गोष्टी तसेच निरीक्षण व वैशिष्ट्यपूर्ण माहिती पाहून उपस्थित सर्वांनी कौतुक केले.या पुस्तकात ३६ सणांची माहिती विज्ञान संकल्पनाद्वारे विविध फोटोसह प्रत्येक पानांवर महत्त्वाच्या माहितीसह तेही मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेमध्ये एकाच पानावर वैशिष्ट्यसह उल्लेख करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी ज्या वयात मुलांनी खेळणे व खेळातून आनंद उपभोगणे हे पारंपरिक दृष्य सगळीकडे दिसते.त्यापेक्षा वेगळा विचार मनात घेवून अशी नाविन्यपूर्ण संकल्पना राबवत पहिल्या पुस्तकातील एक थीम सविस्तरपणे मांडण्यासाठी मार्गदर्शन घेवून कार्यकारी करून पुस्तक प्रकाशित करणे हे खरोखर प्रेरणादायी व कौतुकास पात्र आहे.तसेच त्यांच्या या कार्यामुळे ते आजपासून बालकवी,बाललेखिका, बालकलाकार आणि भाष्यकार म्हणून भविष्यकाळ उज्वल करण्यासाठीची त्यांची वाटचाल सुरू झाली असून एक उत्तम असा स्तुत्य उपक्रम या विद्यार्थीनी राबवत असून त्यांच्या यशस्वी भविष्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.देबेंद्रनाथ मिश्रा,माजी प्र.कुलगुरु पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर तसेच प्रमुख पाहुणे दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,प्रमुख उपस्थिती असलेले श्यामसुंदर मलवाडे,संस्थापक अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक,हिंदीया पेट्रोकेमिकल प्रा.लि.डॉ.सागर कोंडेकर वाचकांपर्यंत पोहोचवून आनंदाने उत्साह व्दिगुणित सन्मानित केले.या कार्यक्रमात मुग्धा गुरमे आणि




संचालक,सामाजिकशास्त्र संकुल उपकेंद्र,पेठ यांनी या चिमुकल्या मुलींच्या अनोखी उपक्रमाची भरभरून प्रशंसा केली. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.मिश्रा म्हणाले की, आल्फाम्यानिक पहिले पुस्तक हे इंग्रजी वर्णमाला शिकणाऱ्यांसाठी केवळ औपचारिक पुस्तक नव्हते, तर अशा विधायक आव्हानात व्यक्त केलेल्या विविध संकल्पना आणि सृजनशील प्रयत्नांचे प्रतिबिंब आहे व त्यातीलच एक उपयुक्त संकल्पना म्हणजे सणवार साजरे करण्यामागचे उद्देश एकत्रित कुटुंबव्यवस्था विखुरली जात असल्यामुळे ज्याची माहिती मुलांना ज्या वयात आजकाल असणे गरजेचे आहे, त्याची चणचण लक्षात घेता विविध जातीधर्मातील सर्वच सणांचा समावेश यात केलेला असून देश अंतर्गत सणांची उपयुक्तता इत्यादींची पुनर्भेट दर्शविते. जेव्हा प्रकाशित पुस्तक लवकरात लवकर करून समजून सणांची साजरीकरण करेल तेंव्हा हे पुस्तक समाजोपयोगी ठरेल.सदर पुस्तकाचे संपादन व प्रकाशन करुन डॉ.कोमल गोमारे व सौ.स्नेहल कोंडेकर यांनी मुलांच्या मौलिक गुणाला ओळखून लोकपरिचयास आणल्याबद्दल त्यांचेही मनस्वी अभिनंदन केले. डॉ.देबेद्रनाथ मिश्रा यांनी आल्फाम्यानिक फेस्टिवलसारख्या पुस्तक प्रकाशनामुळे या देशातील सणांचे महत्त्व नुतन पिढी समजून घेवून अधिक सामर्थ्यशाली व तेजोमय होईल याबाबत संदेह नसल्याचे प्रतिपादन केले. मुलांना इंग्रजी व मराठी दोन्ही ज्ञानाला प्रोत्साहन दिले.देशाचे उत्तम नागरिक म्हणून यापुढेही अनेक समृध्द साहित्य रचना करण्यात येईल हे चिमुकले योगदान देतील असेही मत व्यक्त केले.दोन्ही मुलींना पारितोषिक रोख रक्कम व विज्ञानावरील पुस्तक देऊन त्यांनी ओवी कोंडेकरसहित संपादक स्नेहल यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या पुस्तकाचे प्रकाशन निकिता पब्लिकेशन यांनी केले आहे.

कार्यक्रमाची प्रस्तावना व पाहुण्यांचा परिचय डॉ.कोमल गोमारे यांनी केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भालेराव तसेच आभार प्रदर्शन डॉ. सागर कोंडेकर यांनी केले.या कार्यक्रमास डॉ. शिवचंद्र गुरमे,डॉ.सिद्धी नागिमे, डॉ.शितल रेड्डी, विठ्ठल साबदे, डॉ.गणेश गोमारे,अविनाश मलवाडे,शामसुन्दर मलवाडे, शाळेतील विद्यार्थी,विद्यार्थीनीनी यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महादेव चेवले, क्रांती कांबळे, आशिया शेख, शबाना बुऱ्हाण, दीपाली कल्लेकर, वनमाला मलवाडे, सरोज काळे, गवळी, सुडे हे सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## ना. अतुल सावे, खा. शृंगारे, आ. निलंगेकर, आ. पवार आदींच्या उपस्थितीत ग्रामीण विधानसभेतील भाजपा कार्यकर्त्यांचा २८ मार्च रोजी लातूर येथे मेळावा - आ. कराड

लातूर - लातूर लोकसभा मतदार संघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा राज्याचे इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण मंत्री ना. अतूल सावे यांच्यासह इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत दि. २८ मार्च २०२४ गुरुवार रोजी लातूर येथे आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास भाजपाचे सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिका-यांसह कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांचा मेळावा भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास राज्याचे इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण मंत्री ना. अतूल सावे, भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, जिल्हयाचे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, राज्य कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, माजी आमदार सुधाकर भालेराव, गोविंदअण्णा केंद्रे, बब्रुवान खंदाडे, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, लातूर लोकसभा निवडणूक प्रभारी प्रा. किरण पाटील, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, लातूर लोकसभा निवडणूक प्रमुख राहूल केंद्रे यांच्या अनेक मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

सदरील भाजपा कार्यकर्त्यांचा मेळावा दि. २८ मार्च २०२४ गुरुवार रोजी लातूर येथील भक्ती-शक्ती मंगल कार्यालयात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे तेव्हा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाच्या सर्व लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी, सुपर वॉरीअर्स, शक्तीकेंद्र प्रमुख, बुध प्रमुख आणि भाजपा कार्यकर्त्यासह मतदार बंधू भगिनींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजपाचे लातूर ग्रामीण विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, लातूर तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, भादा सर्कलचे पद्माकर चिंचोलकर यांनी केले आहे.

## २९ मार्च २०२४ रोजी जननायक संघटनेची राज्यस्तरीय बैठक लातूरात

लातूर : जननायक संघटना गेल्या अनेक वर्षापासून जनतेच्या विविध प्रश्नांवर काम करते. सध्याही लातूर जिल्ह्यामध्ये पीक विमा, पाणी प्रश्न, शेतकर्यांच्या लाईटचा प्रश्न, रोजगाराचा प्रश्न, सोयाबीनचे पडलेले भाव असे अनेक प्रश्न घेऊन जननायक संघटना समोर आलेली आहे. त्यामुळे जनतेच्या विविध प्रश्नांबाबत चर्चा करून त्याबाबत पुढील दिशा ठरविण्यासाठी जननायक संघटनेची राज्यस्तरीय महत्त्वपूर्ण विशेष बैठक दि.२९ मार्च २०२४ रोजी सकाळी १०.३० वा.जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेली आहे.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जननायक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर हे उपस्थित राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून जननायक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब कोरे, जिल्हाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, जिल्हा कार्याध्यक्ष निळकंठराव पवार, जिल्हा उपाध्यक्ष सुभाषअप्पा सुलगुडले, लातूर तालुकाध्यक्ष बब्रूवान पवार, महादेव गायकवाड, बाबासाहेब देशमुख, राजाभाऊ मुळे, रेणापूर तालुकाध्यक्ष आप्पासाहेब पाटील, जिल्हा चिटणीस बी.टी. कदम, प्रतापराव शिंदे, लातूर युवा अध्यक्ष उध्दव जाधव, लातूर शहर युवा जिल्हाध्यक्ष राजेश पवार, जिल्हा महिला आघाडीच्या अध्यक्षा सहारा शेख, सूरेखा मुळे, ज्योतीताई भोकरे, यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

या बैठकीमध्ये शेतकर्यांच्या विविध प्रश्नासंदर्भात व शहरी व ग्रामीण भागातील जनतेच्या प्रश्नासंदर्भात या बैठकीमध्ये विस्ताराने चर्चा होणार आहे. तसेच नवीन कार्यकारिणीची निवड, दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या पशुधनाच्या चारापाण्याचा प्रश्न सोडविण्यात यावा, कुणबी प्रमाणपत्र व आरक्षण एसईबीसी प्रमाणपत्र याला स्थगिरती न देता त्यांचे तत्काळ वाटप करण्यात यावे. लातूर शहरातील शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न तत्काळ मार्गी लावावा,कचर्याचा प्रश्न तत्काळ मार्गी लावावा, ऊसाला एफआरपी प्रमाणे भाव देण्यात यावा. नियमीत कर्जाची परतफेड करणार्या शेतकर्याला पुन्हा कर्जवाटप करण्यात यावे आदी प्रश्नावर सविस्तर चर्चा होणार आहे.

त्यामुळे या बैठकीला लातूर जिल्ह्यातील जननायक संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जननायक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, जिल्हा कार्याध्यक्ष निळकंठराव पवार आदींनी केलेले आहे.

# खा.सुधाकर शृंगारे यांच्याकडून मान्यवरांच्या सदिच्छा भेटी

लातूर/प्रतिनिधी: लातूरचे खासदार तथा आगामी निवडणुकीत भाजपाचे उमेदवार असणारे सुधाकर शृंगारे यांनी जिल्ह्यातील मान्यवरांच्या सदिच्छा भेटी घेतल्या.यादरम्यान माजी मंत्री बसवराज पाटील यांनी लातूर लोकसभेसाठी पूर्ण वेळ देण्याची ग्वाही दिल्याचे खा.शृंगारे यांनी सांगितले. भाजपाने लातूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवार म्हणून खा. सुधाकर शृंगारे यांना पुन्हा उमेदवारी जाहीर केली आहे.उमेदवारी जाहीर झाल्यानंतर खा.शृंगारे यांनी मान्यवरांच्या भेटी- गाठींचे सत्र सुरू केले आहे.या अंतर्गत शनिवारी (दि.२३ )खा.शृंगारे यांनी माजी मंत्री तथा औशाचे माजी आमदार बसवराज पाटील यांची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.यावेळी भाजपाचे लातूर लोकसभा प्रभारी किरण पाटील,लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे व गुरुनाथ मगे यांची त्यांच्यासमवेत उपस्थिती होती.

यावेळी बोलताना बसवराज पाटील म्हणाले की,आम्ही पूर्ण ताकदीनिशी तुमच्या पाठीशी आहोत.लोकसभा निवडणुकीत लातूर मतदारसंघासाठी आपण पूर्ण वेळ देणार असून या निवडणुकीत पुन्हा एकदा भाजपाचा झेंडा फडकावणार आहोत.खा.



शृंगारे यांच्या रूपाने भाजपाचा उमेदवार विजयी करण्यासाठी आपण काम करू,अशी ग्वाही त्यांनी दिली. आ.अभिमन्यू पवार यांचीही खा.शृंगारे यांनी भेट घेतली. आ.पवार यांनी खा.शृंगारे यांना आगामी निवडणुकीसाठी यावेळी शुभेच्छा दिल्या. महायुतीतील घटकपक्ष शिवसेनेच्या शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष ड.बळवंत जाधव यांचीही त्यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी जाधव परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. महायुतीतील घटक पक्ष एकत्रितपणे भाजपा उमेदवाराच्या प्रचारासाठी काम करत असून यामुळे शृंगारे यांचा विजय सुकर होणार असल्याचे ड.जाधव यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस कार्यालयाकडे कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी पैंसे नाहीत

मुंबई : ऐन निवडणुकीच्या तोंडावर आयकर विभागाने काँग्रेसचे बँक खाते गोठवल्याने पक्ष आर्थिकदृष्ट्या अडचणीत आला आहे. आता निवडणुकीसाठी काँग्रेसच्या नेत्यांच्या प्रवासाचा खर्च करण्यासाठी आणि कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा पगार करण्यासाठी पक्षाकडे पैसा नसल्याचा दावा ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. दोन दिवसांपूर्वी काँग्रेसचे नेते राहुल गांधींनीही यावर चिंता व्यक्त करत देशभर प्रचारासाठी जाणाऱ्या नेत्यांच्या प्रवासासाठी तिकीट काढण्यासाठीही पैसे राहिले नसल्याचे सांगितले होते.

केंद्रीय आयकर विभागाने २०१७ सालच्या प्रकरणावरून काँग्रेसवर कारवाई करत त्यांची बँक खाती गोठवली होती. तसेच पक्षाला २१० कोटी रुपयांचा दंडही लावला होता. ऐन निवडणुकीच्या काळात आयकर विभागाने केलेल्या या कारवाईवर टीका करत केंद्र सरकारच्या सांगण्यावरून ही सूडबुद्धीने कारवाई केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. त्यानंतर आता पृथ्वीराज चव्हाणांनी यावर प्रतिक्रिया दिली. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, २०१७ सालच्या एका प्रकरणात आयकर विभागाने कारवाई करत काँग्रेसची चार बँक खाती गोठावली आहेत. त्यामुळे पक्षाला आता काहीही व्यवहार करता येत नाही. आयकर खात्याच्या निर्णयाविरोधात आम्ही कोर्टातली अपील केलं आहे, पण त्याचा निकाल लगेच लागण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे आम्हाला काहीच करता येत नाही. काँग्रेसचे नेते दिवंगत सिताराम केसरी यांच्या काळातीर, १९९३ सालच्या एका हिशोबाची त्रुटी दाखवत एक नोटीस आयकर विभागाने बजावली आहे. केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर करून ऐन निवडणुकीच्या काळात काँग्रेसला अडचणीत आणण्याचा भाजपचा डाव असल्याचा आरोप पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. भाजपने निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीचा कायदा बदलला, त्यांच्या मर्जीतले लोक आयोगात बसवले आहेत. त्यामुळे आम्हाला त्यांच्याकडून न्याय मिळण्याची अपेक्षा नसल्याचं पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

## आजारी पत्नीला काम करायला लावणे ही क्रूरता! न्यायालयाचे स्पष्ट मत, पण निकाल मात्र पतीच्या बाजूने, कारण..

नवी दिल्ली : अलीकडेच पत्नीची प्रकृती ठीक नसताना तिला घरातील कामे करण्यास भाग पाडणे ही क्रूरता ठरू शकते, असे मत दिल्ली उच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे. एका घटस्फोटाच्या याचिकेदरम्यान चालू असणाऱ्या सुनावणीत न्यायाधीशांनी घटस्फोटाला मंजुरी देताना पती व पत्नी दोघांनी केलेल्या आरोपांमधील चुकीच्या बाजू स्पष्ट केल्या आहेत. प्राप्त माहितीनुसार याचिकाकर्ता पतीने, असा आरोप केला होता की त्याची पत्नी सुरुवातीपासूनच त्याचा व त्याच्या कुटुंबीयांचा अनादर करत होती ज्यामुळे त्यांचे वैवाहिक आयुष्य फार सुकर नव्हते. ती ना घरच्या खर्चाला हातभार लावायची ना घरी कामात मदत करायची.

न्यायमूर्ती सुरेश कुमार कैत आणि न्यायमूर्ती नीना बन्सल कृष्णा यांचा समावेश असलेल्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने पतीला घटस्फोट मंजूर करताना सांगितले की, ''आमच्या मते, जेव्हा पत्नी घरातील कामे स्वत:च्या इच्छेने करते तेव्हा ती मनापासून आणि प्रेमाने तिच्या कुटुंबासाठी करते, पण जर तिची तब्येत किंवा इतर परिस्थिती तिला काम करण्यासाठी अनुकूल नसेल तर तिला जबरदस्तीने घरची कामे करण्यास सांगणे ही नक्कीच क्रूरता ठरू शकते.''

मात्र निकालात, खंडपीठाने असेही नमूद केले की पतीने कोणतीही चूक केली नाही, कारण त्याने आपल्या पत्नीला घरातील कामे करण्यास भाग पाडले नाही आणि घरगुती कामासाठी घरात मदतनीस सुद्धा नेमली होती. खटल्याचा निकाल देताना, न्यायालयाने असेही सांगितले की या प्रकरणातील अनेक पुरावे असेच सूचित करतात की इथे सदर पत्नी चुकीची होती कारण तिने या प्रकरणात विनाकारण आपल्या पतीवर विवाहबाह्य संबंधांचे आरोप लावले होते तसेच त्याच्या कुटुंबावर सुद्धा आरोप करून चुकीच्या तक्रारी दाखल केल्या होत्या. ''जोडीदाराच्या चारित्र्यावर चुकीचे आरोप करणे हे नात्यात सर्वोच्च क्रूरतेचे प्रमाण आहे, ज्यामुळे विवाहाचा पाया हादरून जातो.

# ''भारत तोडो'' ची भाषा करणाऱ्या गुन्हेगाराला काँग्रेसची उमेदवारी काँग्रेस का हाथ दंगाईयों के साथ भाजपा आ.प्रवीण दरेकर यांची घणाघाती टीका

**मुंबई : दंगल घडविणे, घातक शस्त्रांचा वापर करणे, शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला करणे असे अनेक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या साजिद खान पठाण याला काँग्रेसने अकोला पश्र्चिम विधानसभा मतदारसंघात उमेदवारी देऊन ''काँग्रेस का हाथ, दंगाईयों के साथ '' हेच सिद्ध झाले असल्याची घणाघाती टीका भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेतील गटनेते आ.प्रवीण दरेकर यांनी शनिवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आ.दरेकर बोलत होते. भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान हे यावेळी उपस्थित होते. गाजावाजा करत भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून न तुटलेला भारत जोडण्याचे नाटक करणाऱ्या काँग्रेसने भारत तोडो ची भाषा करणाऱ्या साजिद खानला उमेदवारी देऊन आपला दुटप्पी चेहरा दाखवला असल्याचेही आ.दरेकर यांनी सांगितले.**

आ.दरेकर यांनी यावेळी साजिद खान पठाण याच्याविरुद्ध अकोला शहरातील रामदास पेठ, कोतवाली आणि खदान या तीन पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या १६ गुन्ह्यांची यादीच वाचून दाखवली. नफरत तोडो नव्हे तर नफरत पसरवणे उमेदवारी मागे घेणार का असा सवालही




हाच काँग्रेसचा असली चेहरा आहे अशा शब्दात श्री.दरेकर यांनी काँग्रेसवर शरसंधान साधले. तब्बल १६ गुन्हे दाखल असलेल्या साजिद खान पठाण याला उमेदवारी देऊन काँग्रेसने 'गुन्हेगार टिकवा आणि गुन्हेगारी वाढवा' असे धोरण अवलंबले आहे. अकोल्यात झालेल्या दंगलीतील साजिद खान पठाण हा मुख्य आरोपी असून अशा गुन्हेगाराला दिलेल्या उमेदवारीचा भारतीय जनता पार्टी कडवा विरोध करत आहे. गुन्हेगारांना पाठीशी घालत काँग्रेस गुन्हेगारांचे उदात्तीकरण करत आहे अशी टीकाही त्यांनी केली. काँग्रेस या दंगेखोराची आ.दरेकर यांनी उपस्थित केला. आ.दरेकर म्हणाले की अशा अट्टल गुन्हेगाराला उमेदवार म्हणून माथी मारत सर्वसामान्य जनतेवर काँग्रेस घोर अन्याय करत आहे. अशा अट्टल गुन्हेगारांना सूज्ञ मतदार त्यांची खरी जागा आगामी विधानसभा पोटनिवडणुकीत दाखवून देतील असा विश्र्वास श्री.दरेकर यांनी व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पावर विश्र्वास ठेवत, जातीपाती व पक्षाच्या पलीकडे जाऊन विकासाच्या मुद्द्यावर जनता आगामी निवडणूक हातात घेणार आहे असेही ते म्हणाले.

## घनकचरा जाळणा-या नागरीकांवर होणार कार्यवाही महानगरपालिकेमार्फत क्षेत्रनिहाय पथकाची नियुक्ती...

लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात घनकचरा जाळणे हे प्रतिबंधित आहे. काही आस्थापना / नागरिक घनकचरा जाळत असल्याचे दिसून येत आहे. यावर आळा घालण्यासाठी लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने पुढील प्रमाणे स्वच्छता निरीक्षक यांची पथके नियुक्त करण्यात आली आहेत. क्षेत्र क्र. - करिता श्री.शिवराज शिंदे मो.न. ८८८८२२८३०६, क्षेत्र क्र. इ करिता श्री.धोडिंबा सोनवणे मो.न. ९०२८८४७४००, क्षेत्र क्र. उ करिता श्री.सुनिल कांबळे मो.न. ९८६०६४३८६० व क्षेत्र क्र. ऊ करिता श्री. अक्रम शेख मो.न. ८२०८३८३४५२. दि.२२/०३/२०२४ रोजी सिग्नल कॅम्प, गांधी मार्केट, गिरवलकर मंगल कार्यालय या भागात घनकचरा जाळणा-या (०३) तीन आस्थापना / नागरिकांवर दंडात्मक कार्यवाही करून १५००/- रू. दंड वसुल करण्यात आला आहे. यापुढे आस्थापना / नागरिकांनी घनकचरा जाळल्यास निदर्शनास आल्यास नियुक्त पथकातील पथक प्रमुख यांचे मोबाईल क्रमांकावर घनकचरा जाळल्याचे माहिती देवून नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन लातूर शहर महानगरपालिके मार्फत करण्यात येत आहे.

## मराठवाड्यात भाजपची मोठी खेळी! शिंदेसेनेला फक्त एकच जागा मिळणार?

छत्रपती संभाजीनगर : महाविकास आघाडीप्रमाणेच महायुतीमध्येही जागावाटपाचे गुऱ्हाळ चालूच आहे. महायुतीतील तिन्ही पक्षांत अनेक जागांवरून वाद सुरू आहे. छत्रपती संभाजीनगरच्या जागेवरही अद्याप ठोस तोडगा निघू शकलेला नाही. दरम्यान, मराठवाड्यात मोठी ताकद असूनही एकनाथ शिंदेयांच्या शिवसेनेला येथे फारशा जागा मिळण्याची शक्यता नाही. मिळालेल्या माहितीनुसार गेल्या अनेक दशकांपासून शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या संभाजीनगरची जागादेखील भाजपकडेच राहण्याची शक्यता आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894